14 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील १८ महाविद्यालये 'बाटू'शी संलग्न

## अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयांचा समावेश : विद्यापीठाकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १८ महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्न झाली आहेत. यामध्ये अभियांत्रिकी व फार्मसीच्या महाविद्यालयांचा समावेश आहे. नुकत्याच प्राप्त झालेल्या शासनाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठानेही या महाविद्यालयांना ना हरकत पत्र दिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची २०१४ मध्ये निर्मिती झाली. लोणेरे (जि. रायगड) येथे हे विद्यापीठ आहे. राज्य शासनाचे हे स्वायत्त विद्यापीठ असून, यावर्षी या विद्यापीठाने आपला कार्यविस्तार वाढवला आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील ३२५ महाविद्यालयांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब तंत्रशास्त्र विद्यापीठाशी जिल्हानिहाय संलग्न महाविद्यालये पुढीलप्रमाणे :

**कोल्हापूर :** अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग वाठार तर्फ वडगाव, शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यड्राव, संजीवन इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट संजीवन नॉलेज सिटी, सोमवार पेठ, पन्हाळा.

**सांगली :** संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग मॅनेजमेंट ॲन्ड पॉलिटेक्निक, (टिळकनगर, मिरज), आदर्श



इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च सेंटर (विटा, खानापूर), व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पेठ नाका, वाळवा), पद्मभूषण वसंतराव दादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बुधगाव, मिरज),

**महाराष्ट्रातील ३२५ महाविद्यालयांचा समावेश**

**सातारा :** कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ठाकूरकी (ता. फलटण), अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, (पानमळेवाडी, वरे, सातारा), यशोदा टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग (वाडे फाटा, सातारा), यशोदा टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ फार्मसी (वाडे फाटा, सातारा), अभिनव एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी (वडवाडी, खंडाळा),

### शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांची वाढणार संख्या

तंत्रशिक्षण एकाच विद्यापीठाला जोडायचे असे शासनाचे धोरण आहे. शासन धोरणानुसार शिवाजी विद्यापीठातील १८ महाविद्यालयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाशी संलग्न होण्यासाठी ना हरकत पत्र दिले आहे. विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांची संख्या कमी झाली असली तरी याचा कोणताच परिणाम विद्यापीठावर होणार नाही. कारण दरवर्षी नव्याने किमान तीन महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न होत असतात. त्यामुळे विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढणार आहे.

डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

ज्ञानश्री इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी (सोनवडी-गजवडी, सज्जनगड रोड, सातारा) मेरूलिंक शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी बी फार्म (मेढा, ता. जावळी), कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सदर बजार, आरटीओ ऑफिसजवळ, सातारा), सातारा कॉलेज ऑफ फार्मसी (देगाव, सातारा), सातारा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट (लिंब, सातारा), गौरीशंकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिटीकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (लिंब, सातारा)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2017
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात 'उत्कर्ष' अंकाचे प्रकाशन

**रुकडी / प्रतिनिधी :**

राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रुकडीच्या वार्षिक उत्कर्ष अंकाच्या प्रकाशन सोहळा कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात झाला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे डॉ.डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, डॉ. महेश काकडे, रो. हिराचंद बरगाले, प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे, संपादक डॉ. प्रशांतकुमार कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2017
लोकमत

## दूर शिक्षण अभ्यास केंद्र

इचलकरंजी : येथील कन्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरअंतर्गत दूर शिक्षण अभ्यास केंद्रासाठी मान्यता मिळाली आहे. सन २०१७-१८ पासून बीए व बी.कॉम भाग१, एमए भाग १ व एम कॉम भाग १ ची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. विद्यार्थिनींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.